MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : २० अंक : २ पाने : ८ फेब्रुवारी-मार्च २०२५
www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

२०२४-२०२५ या आर्थिक वर्षात चांगल्या क्षमतेने आपण ठरविलेल्या लक्ष्यांना (Targets) प्राप्त करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला, हे कौतुकास्पद आहे. तसेच भविष्यात २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात कंपनीतील प्रत्येक विभागाकरिता ठरवून दिलेली लक्ष्ये (Targets) गाठण्यात आपल्याला यश येईल, याबद्दल मी आशा बाळगतो. विविध धोरणात्मक निर्णय घेऊन आपण आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याला भविष्यात चांगले यश मिळेल, याची मला खात्री आहे. यामध्ये सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले मोलाचे योगदान देऊन सहकार्य

- **कामांचा नियमित आढावा घ्या**
- **कामांचे योग्य नियोजन करा**
- **विविध अडचणींवर मात करा**
- **सांघिक भावना कायम ठेवा**

केले आहे, हे विसरून चालणार नाही.

राज्य शासनाच्या पहिल्या शंभर दिवसात ऊर्जा विभागाच्या अंतर्गत महावितरण, महानिर्मिती, महापारेषण व महाऊर्जा या कंपन्यांनी केलेल्या कामगिरीच्या प्रगती अहवाल पुस्तकाचे प्रकाशन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते नुकतेच झाले. त्यामध्ये आगामी २५ वर्षांच्या राज्याच्या वाटचालीच्या अनुषंगाने ऊर्जा क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्याची योजना निश्चित केली आहे. पहिल्या शंभर दिवसात वीजविषयक सार्वजनिक कंपन्यांसाठी विविध उद्दिष्टे ठरविण्यात आली. त्या उद्दिष्टांची माहिती व त्याची पूर्तता याचा लेखाजोखा मांडणारे 'हंड्रेड डेज फॉर ट्वेंटी फाईव्ह इयर्स' या अहवालपर पुस्तकात महापारेषणचा प्रगती अहवाल मांडण्यात आला आहे.

ऊर्जा विभागाच्या अंतर्गत चारही कंपन्यांना देण्यात आलेली बहुतांश उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यात आली आहेत. वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे, वीज वितरण जाळ्यांची क्षमता वाढविणे, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प सुरू करणे, सरकारी कार्यालये सौर ऊर्जेवर चालविण्याची योजना अशी अनेक उद्दिष्टे वीज कंपन्यांना देण्यात आली. यामध्ये शंभर दिवसांचा आराखडा पूर्ण करण्यात ऊर्जा विभाग अव्वल ठरला आहे. अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सांघिक कामामुळेच (Team Work) हे यश मिळाले आहे.

महापारेषणच्या मनुष्यबळ विकास विभागाने सर्व कामे डिजिटल पध्दतीने सुरू करण्यावर भर देऊन तब्बल सात ऑटोमेशन प्रकल्प पूर्ण केले आहेत. मनुष्यबळ विकास विभागाने ईआरपी व माहिती तंत्रज्ञान यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. यामध्ये शिस्तभंग कारवाई विभागाने एसएपी (SAP) या डिजिटल प्रणालीव्दारे सर्व अहवाल व सद्यस्थितीची माहिती एका क्लिकवर केल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा गतीने व तात्काळ मिळणे सुलभ झाले आहे.

ई-सर्व्हिस बुकच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना आता वास्तविक स्थिती (रिअल टाईम डाटा) मिळणे सोयीचे झाले आहे. त्यामुळे सांघिक कार्यालयाबरोबर क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. ई-गव्हर्नन्स, ई-ऑफिसमुळे कामे गतीने व पारदर्शी पध्दतीने होण्यास मदत होणार आहे. मला वाटते, हा डिजिटल बदल नक्कीच स्वागतार्ह आहे. माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता यांचा जास्तीत-जास्त वापर करून महापारेषण कंपनीला कायम अग्रेसर ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

कंपनीची प्रगती करणे ही जशी व्यवस्थापनाची जबाबदारी आहे, तशीच ती प्रत्येक अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांची देखील आहे. सर्व कर्मचारी हे संघटनात्मक स्तरावर आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावून या कंपनीच्या प्रगतीत मोलाचा हातभार लावू शकतात. महापारेषणचे कर्मचारी हे त्यांच्या विशेष तांत्रिक ज्ञानाने व कुशलतेने परिपूर्ण आहेत. अनुभवी कर्मचारी मोठ्या कुशलतेने आपली यंत्रणा सांभाळण्याचे काम करत आहेत, याची मला खात्री आहे.

देशाचे नियोजन हे प्रत्येक राज्याच्या नियोजनात्मक कामगिरीवर देखील अवलंबून असते. विविध प्रकल्पांची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण करून आपण देशकार्यात हातभार लावत असतो. महापारेषणच्या विविध प्रकल्पांची कामे योग्यरित्या सुनियोजन करून पूर्ण करणे, हे आपले महत्त्वाचे कार्य आहे. महत्त्वाकांक्षी टप्पे गाठताना यंत्रणेचे



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

मजबुतीकरण, सुव्यवस्था व अपघातशून्य कार्यक्षेत्र हे घटकसुध्दा तितकेच महत्त्वाचे असतात. कोणतीही जोखीम न घेता निर्देशित केलेल्या कार्यप्रणालीनुसार काम करणे गरजेचे असते.

वीजक्षेत्रामध्ये विविध आव्हाने लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी आपण सदैव तत्पर असले पाहिजे. आधुनिकीकरणाची गती वाढवत असतानाच गुणवत्ता, कार्यतत्परता व कामाप्रती निष्ठा ठेऊन काम पूर्णत्वास नेणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सांघिक यशाकरिता सकारात्मकता, नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व निरंतर सुधारणेसाठी प्रयत्न. या तिन्ही गोष्टी आपल्या कंपनीच्या यशस्वी वाटचालीसाठी गरजेच्या आहेत. कामांचा नियमित आढावा, सूत्रबध्द नियोजन, विविध आव्हानांशी सामोरे जाण्याची तयारी व विविध अडचणींवर वेळेवर लक्ष देऊन संसाधनांचा योग्य समन्वय साधून त्या दिशेने काम करण्यासाठी सांघिक भावनेने सर्वांना प्रोत्साहित करावे, याकरिता मी सर्वांना मनापासून आवाहन करतो.

**शुभेच्छांसह..!**

**- डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**मुंबई :** विधानभवनात मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महापारेषण प्रकल्पांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. याप्रसंगी राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार श्री. दिलीप वळसे-पाटील, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव श्रीमती अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव (वने) श्री. मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती विनिता सिंगल, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्यासह इतर संबंधित यंत्रणांचे अधिकारी.

## ▶ विविध प्रकल्पांबाबत आढावा बैठक

# महापारेषणच्या विविध मंजूर प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करावीत : मुख्यमंत्री

Follow us on :

राज्यात विविध क्षेत्रांसाठीची विजेची मागणी लक्षात घेऊन आवश्यक वीजपुरवठा सुरळीतपणे व अखंडितपणे करण्यासाठी महापारेषणच्या विविध मंजूर प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधानभवनात मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित महापारेषण प्रकल्पांबाबत आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले. बैठकीस राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार श्री. दिलीप वळसे-पाटील, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव श्रीमती अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव (वने) श्री. मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती विनिता सिंगल, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्यासह इतर संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच संबंधित जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणच्या विविध जिल्ह्यातील



प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेऊन सर्व ठिकाणची कामे तातडीने विनाविलंब पूर्ण करण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पालघरमध्ये जास्त प्रमाणात कामे प्रलंबित असून त्या कामांची तातडीने पूर्तता करावी. वाढवणच्या दृष्टीने विचार करुन टीबीसीबी प्लॅनिंग अंतर्गत गतीशक्ती प्लॅटफॉर्मवर त्याच्या नियोजनाचा विचार करावा. तसेच नवी मुंबई डेटा सेंटर हबला ग्रीन पॉवर देण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्याचे सूचित केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, स्थानिक राजकीय वा इतर



कुठल्याही हस्तक्षेपाला न जुमानता सर्व संबंधित यंत्रणांनी ट्रान्समिशन टॉवरच्या उभारणीच्या कामांना गती द्यावी. यासाठी आवश्यक त्या जिल्ह्यांमध्ये पोलिस अधीक्षकांनी पोलिस संरक्षण उपलब्ध करुन द्यावे. सर्व यंत्रणांनी परस्पर सहकार्याने पारेषण प्रकल्पांचे काम गतीने पुढे नेण्याची खबरदारी घेण्याचे मुख्यमंत्री यांनी यावेळी सूचित केले.

राज्याच्या वाढीव विजेची मागणी लक्षात घेता सर्व क्षेत्रांना आवश्यक वीज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने हे प्रकल्प पूर्ण होणे महत्त्वाचे आहेत, त्यादृष्टीने संबंधित यंत्रणांनी कामांची अंमलबजावणी अधिक गतीमान करुन सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

बैठकीत बाभळेश्वर-कुडुस, शिक्रापूर-रांजणगाव, जेजुरी-हिंजवडी, पडघे-वाडा आणि कोलशेत-वाडा, विशविंद-भेंडा, बाभळेश्वर-राजुरी-अहिल्यानगर एमआयडीसी, बोईसर (एमआयडीसी)-डहाणू, पडघे वाडा, नागेवाडी-भोकरदन, डहाणू सूर्यानगर एमएमआरडीए आणि कावदास जव्हार, धानोरा यावल ते चोपडा, उमरेड-नागभीड या वीजवाहिन्यांच्या कामाबाबत आढावा घेण्यात आला.

ट्रान्समिशन नेटवर्क विस्तार योजना २०२४-३४ अंतर्गत १,५४,५२२ कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असून ८६,६५६ नवीन कॉरिडॉरचे काम करण्यात येणार आहे. या संदर्भातील कामांच्या नियोजनाबाबत अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांनी सविस्तर माहिती दिली.



**मुंबई :** राज्य शासनाच्या पहिल्या शंभर दिवसात ऊर्जा विभागाच्या अंतर्गत महावितरण, महानिर्मिती, महापारेषण व महाऊर्जा या कंपन्यांनी केलेल्या कामगिरीच्या प्रगती अहवाल पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधानभवनात झाले. याप्रसंगी ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, उद्योग सचिव श्री. पी. अन्बलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी., मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव श्रीमती अश्विनी भिडे, लेखक व स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदराणा आणि श्रीमती नीता केळकर

## ▶ चारही वीज कंपन्यांना दिलेली उद्दिष्टे वेळेत पूर्ण

# ऊर्जा विभागाच्या शंभर दिवसांच्या रिपोर्ट कार्डचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन

Follow us on :

राज्य शासनाच्या पहिल्या शंभर दिवसात ऊर्जा विभागाच्या अंतर्गत महावितरण, महानिर्मिती, महापारेषण व महाऊर्जा या कंपन्यांनी केलेल्या कामगिरीच्या प्रगती अहवाल पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधानभवन येथे करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी २५ वर्षांच्या राज्याच्या वाटचालीच्या अनुषंगाने ऊर्जा क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्याची योजना निश्चित केली आहे. त्यांच्या व्हिजनला अनुसरून पहिल्या शंभर दिवसात वीजविषयक सार्वजनिक कंपन्यांसाठी विविध उद्दिष्टे ठरविण्यात आली. त्या उद्दिष्टांची माहिती व त्याची पूर्तता याचा लेखाजोखा मांडणारे ‘हंड्रेड डेज फॉर ट्वेंटी फाईव्ह इयर्स’ हे अहवालपर पुस्तक महावितरणचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी केले आहे.

एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, उद्योग सचिव श्री. पी. अन्बलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी., मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव श्रीमती अश्विनी भिडे, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदराणा आणि श्रीमती नीता केळकर उपस्थित होते.

अहवाल पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सरकारच्या पहिल्या शंभर दिवसात महावितरणने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे याचिका दाखल करून वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडला. आगामी काळातील विजेची गरज पूर्ण करण्यासाठी राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला असून त्यामध्ये नवीकरणीय ऊर्जेवर भर देण्यात आला आहे. त्यामुळे वीजखरेदी खर्चात मोठी कपात होणार असून या पार्श्वभूमीवर वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

ऊर्जा विभागाच्या अंतर्गत चारही कंपन्यांना देण्यात आलेली बहुतांश उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांच्या हिताच्या मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत पंप बाबतीत तसेच प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंतर्गत घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्याच्या बाबतीत उद्दिष्टांपेक्षा जास्त कामगिरी झाली आहे.

विद्युत ग्राहकांना नवीन वीज कनेक्शन देणे, अखंडित वीजपुरवठा करणे, ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करणे, वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे, वीज वितरण जाळ्याची क्षमता वाढविणे, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प सुरू करणे, सरकारी कार्यालये सौर ऊर्जेवर चालविण्याची योजना अशी अनेक उद्दिष्टे या कंपन्यांना देण्यात आली. शंभर दिवसांचा आराखडा पूर्ण करण्यात ऊर्जा विभाग अव्वल ठरला आहे.

कामगिरीचे रिपोर्ट कार्ड प्रकाशित करण्याची सुरुवात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः कडे असलेल्या ऊर्जा विभागापासून केली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco @maha_transco MahaTransco
MahaTransco Mahatranscoltd MahaTransco

Work Review




**मुंबई :** ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी निर्मल भवन येथे बैठक घेतली. या बैठकीस आमदार श्री. अनुप अग्रवाल, आमदार श्री. राघवेंद्र पाटील, आमदार श्रीमती मोनिका राजळे, महापारेषणचे संचालक श्री. अरविंद भादीकर, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकारी.

## ▶ ऊर्जाविषयक प्रश्नांचा राज्यमंत्र्यांनी घेतला आढावा

# धुळे येथील विजेची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत : श्रीमती मेघना बोर्डीकर

Follow us on :

धुळे शहर व ग्रामीण तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील विजेच्या प्रलंबित कामांना गती देऊन ती तातडीने पूर्ण करावीत. तसेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा मिळावा, यासाठी निरंतर वीज योजनेतून जास्तीत- जास्त रोहित्रे उपलब्ध करून द्यावीत, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी दिले.

राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी निर्मल भवन येथे बैठकीत धुळे शहर व धुळे ग्रामीणचा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुका येथील ऊर्जाविषयक प्रश्नांच्या अनुषंगाने आढावा घेतला. यावेळी आमदार श्री. अनुप अग्रवाल, आमदार श्री. राघवेंद्र पाटील, आमदार श्रीमती मोनिका राजळे, महावितरणचे संचालक श्री. अरविंद भादीकर, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्री. प्रकाश लिमकर, महापारेषणच्या भुसावळ मंडलचे अधीक्षक अभियंता श्री. मनीष खत्री, अधीक्षक अभियंता श्री. उदय येवले, महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. रमेश पवार उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी धुळे जिल्ह्यातील वीजपुरवठा सुधारण्याच्या उपाययोजनांवर तातडीने काम करावे. महापारेषणने धुळे ग्रामीण येथील बोरिस व शिरूर येथे १३२ के.व्ही. चे दोन उपकेंद्र तत्काळ प्रस्तावित करावीत. तसेच धुळे शहरातील एमआयडीसी जवळील अतिरिक्त जागा उपलब्ध होऊन एमआयडीसीचे वाढीव क्षेत्र निर्माण होत आहे. तेथे नवीन उद्योगांची उभारणी होत आहे. त्या दृष्टीने एमआयडीसीलगत १३२ के.व्ही. च्या उपकेंद्राचा प्रस्तावही तत्काळ मार्गी लावावा, अशा सूचना राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी दिल्या.

धुळे शहरात काही ठिकाणी विजेच्या तारा उंच इमारतीला चिकटलेल्या असल्याने धोकादायक स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ए. बी. केबलसाठी निधीची तरतूद करण्यात यावी. तसेच धुळे शहर व ग्रामीण भागातील व अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील पावसाळ्यापूर्वी विद्युत देखभाल दुरुस्तीची कामे तातडीने करण्यात यावी. वीज गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी वीज चोरी करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देशही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी दिले.

कुसुम योजनेची प्रलंबित कामे व मागील त्याला सौर कृषी पंप योजनेची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

नारीशक्ती

▶ छत्रपती संभाजीनगर परिमंडळात महिला दिन उत्साहात

# महिलांनी सक्षमपणे पुढे येऊन नेतृत्व करावे : कादरी

Follow us on :

घरातील स्त्रियांच्या सहकार्यामुळेच पुरुष मंडळी कार्यालयात सक्षमपणे काम करू शकतात. त्या आपल्या खाण्यापिण्याची व इतर जबाबदाऱ्यांची काळजी घेतात, म्हणून आपण मन लावून काम करू शकतो. महिलांनीही सक्षमपणे पुढे येऊन नेतृत्व करावे, असे प्रतिपादन मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांनी केले.

महापारेषण छत्रपती संभाजीनगर परिमंडळात जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी बोलत होते.

छत्रपती संभाजीनगर परिमंडळात प्रशासकीय इमारतीत साजऱ्या झालेल्या मुख्य कार्यक्रमात अधीक्षक अभियंता श्रीमती अंजना ठक्कर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्रीमती मंजुषा दुसाने आणि सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्रीमती स्वाती यंबल यांची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे या तिन्ही महिला वरिष्ठ पदांवर कार्यरत असल्याचा उल्लेख मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांनी आपल्या भाषणात केला.

परिमंडळातील सर्व महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना या उपक्रमात सहभागी होता यावे, यासाठी मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्रीमती मंजुषा दुसाने यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, लातूर, बीड आणि नांदेड या ठिकाणी मराठवाड्यामधील कार्यकारी अभियंता अउदा संवसु विभाग लातूर श्री. प्रकाश जायभाये, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, नांदेड श्री. माधव सोनकांबळे, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, जालना श्री. आदिनाथ भाले, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, बीड श्री. वासुदेव लबासे व कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, परभणी श्री. श्रीनिवास तिडके यांच्या अथक परिश्रमाने एकाच दिवशी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाकरिता अधीक्षक अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संजीव कांबळे, अधीक्षक अभियंता श्री. संजीव कुमार सुरडकर, अधीक्षक अभियंता श्रीमती अंजना ठक्कर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. या कार्यक्रमात सुमारे २६० कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रकाश मूधळवाडकर यांनी केले.

## महिला सन्मान व प्रेरणादायी विचार

याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्रीमती अंजना ठक्कर यांनी सांगितले की, "महिला कर्मचारी स्वतःच्या मेहनतीने आणि जिद्दीने कार्य करतात, पण पुरुष सहकाऱ्यांचे सहकार्यही महत्त्वाचे आहे. तसेच महाव्यवस्थापक श्रीमती मंजुषा दुसाने यांनी संपूर्ण मराठवाड्यात एकाच वेळी एकाच दिवशी महिला दिन कार्यक्रम आयोजित करण्याच्या कल्पनेला वाव दिल्याने मुख्य अभियंत्यांचे आभार मानले. सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती स्वाती यंबल यांनी जागतिक महिला दिन ८ मार्चला का साजरा केला जातो? याबद्दलची पार्श्वभूमी सांगून उपस्थित सर्व महिला कर्मचारी यांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## संपूर्ण परिमंडळात आरोग्य तपासणी

महिलादिनानिमित्त बीपी, शुगर, ईसीजी, दंत तपासणी, नेत्र तपासणी, बोन डेन्सिटी तपासणी यासारख्या विविध आरोग्य तपासण्या महिला व पुरुष कर्मचारी, आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आयोजित करण्यात आल्या. यावेळी तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांच्या आरोग्यविषयक समस्या, रजोनिवृत्ती, हृदयविकार आणि आरोग्य व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.

## सीपीआरचे महत्त्व आणि प्रात्यक्षिक

या कार्यक्रमात डॉक्टरांनी सीपीआरबद्दल सखोल माहिती देत सीपीआरचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करून उपस्थित कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीत जीवन वाचवण्याचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच कार्यालयात व्हीलचेअर, ॲम्ब्युलन्स आणि तत्काळ वैद्यकीय सुविधा उपलब्ध असाव्यात, जेणेकरून हृदयविकारासारख्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये तत्काळ मदत मिळू शकेल, असेही त्यांनी सुचवले.



## नाट्यकर्मी श्री. घनश्याम गायकवाड यांचा विशेष सत्कार

महापारेषणमधील प्रसिद्ध नाट्यकर्मी श्री. घनश्याम गायकवाड हे ३१ मार्च २०२५ रोजी होणार आहेत. जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमादरम्यान मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल संपूर्ण परिमंडळाने त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**Women Power** ▶ महापारेषणमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

# तणाव निवारण्यासाठी प्राणिक हिलिंग गरजेची : प्रिया सबनीस-आर्ते

Follow us on :

'महिलांना तणाव निवारण्यासाठी व सकारात्मक मानसिक आरोग्यासाठी नियमित प्राणिक हिलिंग व एनर्जी हिलिंग थेरपी गरजेची आहे. त्यामुळे मानसिक समाधान वाढीला लागते', असे योगविद्या प्राणिक हिलिंग फाऊंडेशनच्या विश्वस्त श्रीमती प्रिया सबनीस-आर्ते यांनी केले.

महापारेषणच्या वतीने वांद्रे येथील मुख्य कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त श्रीमती सबनीस-आर्ते यांनी प्राणिक हिलिंग व एनर्जी हिलिंग थेरपीबाबत माहिती सांगितली. यावेळी महिलांसाठी विविध उपक्रम व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले होते.

श्रीमती सबनीस-आर्ते म्हणाल्या, 'प्राणिक हिलिंगमुळे शरीर व मन सक्षम होते. तसेच स्वतः:ला पुनर्जीवित करण्यासाठी ऊर्जा वाहिनीकरण आवश्यक आहे. मनशांतीसाठी ध्यानधारणा केली तर महिलांना आपल्या दैनंदिन कामात ताणतणावाचे व्यवस्थापन चांगल्या पध्दतीने करता येईल.'

यावेळी महापारेषणच्या संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर यांनीही महिलांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, अधीक्षक अभियंता श्रीमती शारदा ताकपेरे यांच्यासह अनेक महिला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या.

तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाच्या वतीने महिला अधिकाऱ्यांना मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे यांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. महेश आंबेकर, श्री. राजेश पाटील, श्री. सुनील गडलिंग, श्रीमती सीमा डुबेवार यांनी परिश्रम घेतले.



**मुंबई :** महापारेषणच्या वतीने वांद्रे येथील मुख्य कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमात योगविद्या प्राणिक हिलिंग फाऊंडेशनच्या विश्वस्त श्रीमती सबनीस-आर्ते यांनी प्राणिक हिलिंग व एनर्जी हिलिंग थेरपीबाबत महिलांना माहिती सांगितली.



### महापारेषणच्या प्रगतीत महिलांचा मोठा वाटा : डॉ. संजीव कुमार

महापारेषणच्या विकास व प्रगतीत महिलांचा मोठा वाटा आहे. परिमंडलात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेहमीच चांगली कामगिरी केली आहे, याचा कंपनीला मोठा अभिमान आहे. यापुढेही महिला अधिकारी व कर्मचारी चांगली कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावतील, असे महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी सांगून जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

---

▶ जागतिक महिलादिनी नाशिक परिमंडळात विविध कार्यक्रम

# कामात पुढाकार घेऊन महिलांनी प्रगती करावी : श्री. भोळे

Follow us on :

महापारेषणच्या नाशिक परिमंडळातील सर्व महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व कामांत पुढाकार घेऊन आपली सर्वांगीण प्रगती करण्यासाठी सदैव तत्पर राहावे, असे आवाहन नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त महापारेषणच्या नाशिक परिमंडळाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री. भोळे आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात महिला सबलीकरण, महिलांची ग्रामीण व शहरी भागातील सद्यस्थिती, महिलांवर होणारे अत्याचार व त्यावरील उपाय, महिलांची झालेली सर्व क्षेत्रातील उल्लेखनीय प्रगती, महिलांप्रती समाजाकडून अपेक्षित असलेली जबाबदारी व त्यांच्या अपेक्षा अशा विविध विषयांवर महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे यांच्या हस्ते महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, श्री. अनिल भारसाकळे, श्री. प्रकाश लिमकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद घोलप, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे व वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) श्रीमती पल्लवी बनकर आदी उपस्थित होते.

### नाशिक परिमंडळात मोफत आरोग्य तपासणी

नाशिक परिमंडळातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सह्याद्री रुग्णालयाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात सुमारे २०० जणांची तपासणी करण्यात आली.



**नाशिक :** जागतिक महिला दिनानिमित्त नाशिक परिमंडळाच्या वतीने महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, श्री. अनिल भारसाकळे, श्री. प्रकाश लिमकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मिलिंद घोलप, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे व वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) श्रीमती पल्लवी बनकर


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in

### अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महापारेषणमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी





**मुंबई :** येथील महापारेषणच्या मुख्य कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. किशोर पाटील, श्री. प्रशांत गोरडे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. सचिन खडगी.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले.

सुरूवातीला महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. सचिन खडगी, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. किशोर पाटील, श्री. प्रशांत गोरडे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवचरित्रकार समाधान हेंगडे-पाटील यांचे व्याख्यान

# नाशिक परिमंडळात शिवजयंती उत्साहात साजरी



Follow us on :

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती नाशिक परिमंडळात उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून प्रसिध्द शिवचरित्रकार श्री. समाधान हेंगडे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व कर्तृत्व रोमांचकपणे उपस्थितांसमोर सादर केले.

या कार्यक्रमात कर्मचाऱ्यांचे पाल्य बाल शिवाजी व जिजाबाई यांच्या वेशभूषा करून आले होते. या मुलांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांचेशी संबंधित विषयावर रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महिला कर्मचाऱ्यांनी रांगोळी स्पर्धेत मोठा सहभाग घेतला.

या स्पर्धेत काढण्यात आलेल्या रांगोळ्यांचे परीक्षण करून प्रथम तीन क्रमांकांना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे यांनी भूषविले. या प्रसंगी नाशिक परिमंडळातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## Digital Mahatransco




### ▶ डिजिटल व ऑनलाईन पध्दतीने कामे करण्यावर भर

# महापारेषणचे तब्बल सात ऑटोमेशन प्रकल्प पूर्ण

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) डिजिटल क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकले आहे. महापारेषणच्या मनुष्यबळ विकास विभागाने सर्व कामे डिजिटल पध्दतीने सुरू करण्यावर भर देऊन तब्बल सात ऑटोमेशन प्रकल्प पूर्ण केले आहेत. याबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी अभिनंदन केले आहे.

महापारेषणचे संचालक (मनुष्यबळ विकास) श्री. सुगत गमरे यांच्या मार्गदर्शनाखाली मनुष्यबळ विकास विभागाने ईआरपी व माहिती तंत्रज्ञान यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. यामध्ये शिस्तभंग कारवाई विभागाने एसएपी (SAP) या डिजिटल प्रणालीव्दारे सर्व अहवाल व सद्यस्थितीची माहिती एका क्लिकवर केल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा गतीने व तात्काळ मिळणे सुलभ झाले आहे.

ई-सर्व्हिस बुकच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना आता वास्तविक स्थिती (रिअल टाईम डाटा) मिळणे सोयीचे झाले आहे. त्यामुळे सांघिक कार्यालयाबरोबर क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. ऑनलाईन रजा व्यवस्थापनामध्ये वर्ग-१ ते वर्ग-३ चे अधिकारी व कर्मचाऱ्यांना ऑनलाईन रजा भरता येणार आहे. त्यामुळे पेपरलेस कामाकडे महापारेषणचा कल वाढलेला आहे. तसेच मोबाईल ऍपच्या माध्यमातून अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता, संचालक यांना रजा नोंदी व मंजुरीकरण करणे सोयीस्कर झाले आहे.

ऑनलाईन प्रॉपर्टी रिटर्न टप्पा-१ मध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्मचारी पोर्टलवर जाऊन मालमत्ताविषयक माहिती ऑनलाईन पध्दतीने भरता येणार आहे. यामध्ये आतापर्यंत तब्बल ६ हजार ७९३ कर्मचाऱ्यांनी माहिती भरली आहे. ऑनलाईन विनंती बदली प्रणालीमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांची विनंती बदली अर्ज सादर करता येणार आहे. यामुळे मनुष्यबळ विकास विभागाची कामे गतीने आणि पारदर्शीपणे होणार आहेत.

या डिजिटल व ऑनलाईन पध्दतीमुळे महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती एका क्लिकवर तात्काळ मिळणे सोपे झाले आहे. याव्दारे अधिकारी व कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती कंपनीची सेवाविषयक माहिती, प्रशिक्षणाची माहिती हे तात्काळ पाहणे सुलभ झाले आहे.

### महापारेषणची वाटचाल डिजिटलकडे : डॉ. संजीव कुमार



राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली महापारेषणची वाटचाल वेगाने सुरु आहे. महापारेषणचे विविध प्रकल्प डिजिटल व ऑनलाईन पध्दतीने सध्या सुरु आहेत. ई-गव्हर्नन्स, ई-ऑफिसमुळे कामे गतीने व पारदर्शी पध्दतीने होण्यास मदत होणार आहे. माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता यांचा जास्तीत-जास्त वापर करून महापारेषण कंपनीला कायम अग्रेसर ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.



संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.